


निंभोरे : बेकरी पदार्थांची रेसिपी कुतूहलाने पाहताना मुले.

# हॉटेल कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी 'हॉटेल जॅक्सन इन'मध्ये शिबिर

फलटण शहर, ता. २० : निंभोरे (ता. फलटण) येथील हॉटेल जॅक्सन इन ने सामाजिक बांधिलकी जपत हॉटेल कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी उन्हाळ शिबिराचे आयोजन केले. हॉटेल जॅक्सन इनमध्ये आयोजित सहा दिवसीय उन्हाळी शिबिरास मुलांचा उत्साही प्रतिसाद मिळाला आहे. गाव हॉटेल ते अद्ययावत सुविधायुक्त हॉटेल्स याची ओळख या माध्यामातून मुलांना करून देण्यात आली. सकाळी नऊ ते सायंकाळी सहा यावेळेत मुलांसाठी विविध प्रकारच्या खेळांच्या स्पर्धा, बेकरी क्लासेस, शैक्षणिक व विनोदी सिनेमा, संगणक प्रशिक्षण, कविता वाचन, नाटिका, कार्यानुभव असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत, तर मुलांना शेतीविषयी सखोल माहिती मिळावी, यासाठी त्यांना बारामती येथील कृषी विज्ञान केंद्रात घेऊन जाण्यात येणार आहे. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांची बालवयातच संस्कारश्रम व योग्य दिशादर्शक वातावरणात जडणघडण होणे आवश्यक असते. त्यानुसार त्यांचे परिसराशी नाते घट्ट करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे हॉटेल जॅक्सन इनच्या संयोजकांनी सांगितले.